नागपूर महानगरपालिका, नागपूर

(नगर रचना विभाग)

श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर–440001

फॅक्स क्र. 0712 –2561584, वेबसाईट – www.nmc.nagpur.gov.in

जा.क्र.मनपाना/नरवि/सुधारीत अभिन्यास अंतीम मंजुरी/19 दिनांक :– 19/11 /2018

प्रति,

मे. गोल्डब्रिक्स इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,
मॉडेल मिल, गणेशपेठ, नागपूर

विषय:—मौजा — नागपूर, खसरा क्र. ४१९, ४२०, ४२४, ४२६/१, नगर भुमापन शिट क्र. २५९,२६०, २७० आणि २७१ मधील नगर भुमापन क्र. १०१ (भागश:) या जागेवरील पुर्व मंजुर अभिन्यास नकाशा क्र. मनपाना/नरवि/अंतिम मंजुरी/१८, दि. १०.१०.२०१८ मधील भुखंड क्र. १ चे नमुद क्षेत्रातील चुकीची दुरूस्ती करून सुधारीत अभिन्यास नकाशास अंतिम मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ:—आपले या कार्यालयास असलेले पत्र दि. २६.१०.२०१८.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राचे अनुषंगाने, मौजा — नागपूर, खसरा क्र. ४१९, ४२०, ४२४, ४२६/१, नगर भुमापन शिट क्र. २५९, २६०, २७० व २७१ मधील नगर भुमापन क्र. १०१ (भागश:) या जागेवरील १,१७,२५७.०० चौ.मी. क्षेत्राचे अभिन्यास नकाशाचे प्रस्तावास मा. आयुक्त, महोदय यांचे मान्यतेने यापुर्वी पत्र क्र. मनपाना/नरवि/अंतिम मंजुरी/१८, दि. १०.१०.२०१८ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. या मंजुरीनूसार असलेल्या अभिन्यास नकाशामध्ये नकाशाच्या उजवीकडील बाजुस नमुद क्षेत्र परिगणनेच्या तक्त्यामध्ये भुखंड क्र. १ च्या क्षेत्राचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

क्षेत्र — ७३७७५.१११ चौ.मी.
+ ११७२५.७०० चौ.मी. (सुविधा क्षेत्र)

एकुण = ८५,५००.८११ चौ.मी.

परंतू भुखंड क्र. १ चे स्थानांकन ज्या ठिकाणी दर्शविण्यात आलेले आहे तेथे खालीलप्रमाणे क्षेत्राचे चुकीचे विवरण नमुद झालेले आहे.

क्षेत्र — ७०५११.४११चौ.मी.
+ ११७२५.७०० चौ.मी. (सुविधा क्षेत्र)

एकुण = ८२२३७.१११ चौ.मी

या अनुषंगाने विषयांकित जागेवरील पुर्व मंजुर अभिन्यास नकाशातील भुखंड क्र. १ चे क्षेत्र नमुद करतांना झालेल्या चुकीची दुरूस्ती करून सुधारीत अभिन्यास नकाशामध्ये भुखंड क्र. १ चे क्षेत्र परिगणन तक्त्यानूसारच स्थानांकनाचे ठिकाणी खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेले आहे.

क्षेत्र — ७३७७५.१११ चौ.मी.
+ ११७२५.७०० चौ.मी. (सुविधा क्षेत्र)

एकुण = ८५,५००.८११ चौ.मी.

करिता मौजा —नागपूर, खसरा क्र. ४१९, ४२०, ४२४, ४२६/१, नगर भुमापन क्र. १०१ (भाग), शिट क्र. २५९, २६०, २६९, २७० आणि २७१, या जागेवरील ११७२५७.०० चौ.मी., क्षेत्राचे सुधारीत अभिन्यास नकाशामध्ये भुखंड क्र. १ चे नमुद क्षेत्रातील चुकीची दुरूस्ती करून सुधारीत अभिन्यास नकाशास खालीलनमुद अटीं व शर्तीच्या अधिन राहुन अंतिम मंजुरी देण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ अंतर्गत सुधारणा अधिनियम २०१४ (दुसरी सुधारणा) यात अनुमोदीत कलम ४२ अ नुसार औपचारीकता अर्जदार यांना करावी लागेल.
2) आपणांस महानगरपालिकेशी दि. ०५/०३/२०१० ला केलेल्या करारनाम्यातील सर्व अटी बंधनकारक राहतील.
3) अभिन्यासातील रस्ते, मलनिस्सारण वाहिनी, पावसाळी नाली, पिण्याच्या पाण्याची लाईन इत्यादिचे नकाशे नागपूर महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाकडुन मंजुर करुन घ्यावे लागतील.
4) प्रस्तुत प्रकरणी, दिवाणी न्यायालय, मा. उच्च न्यायालय येथे भविष्यात उद्‌भवणाऱ्या बाबीं विषयी अर्जदार स्वत: सर्वस्वी जबाबदार राहतील.
5) शासनाचे दि. २०.०७.२००७ चे अधिसुचनेनूसार अभिन्यास नकाशामध्ये दर्शविलेल्या, एकुण जमिन क्षेत्राच्या २५% सोयी सुविधा क्षेत्र– २९३१४.२५० चौ.मी. पैकी ५०% सुविधा क्षेत्रातील २०% ग्रंथालय इमारतीकरीता राखीव जमिन क्षेत्र– २९३१.४२५ चौ.मी. (सुविधा क्षेत्र क्र. ३) महानगरपालिकेस हस्तांतरीत करावे लागेल.
6) अभिन्यासातील सुविधा क्षेत्रामध्ये असलेला तात्पुरता स्वरूपातील रस्ता, अभिन्यासातील जागेचा संपुर्ण विकासाअंती बंद करून अभिन्यासात दर्शविलेले रस्ता खुला करण्यात यावा.
7) पुर्व मंजुर अभिन्यास नकाशा क्र. १) मनपाना/नरवि/अभि. मंजुरी /१८९०, दि.०५.०३.२०१० २) मनपाना/नरवि/अंतिम मंजुरी/०७, दि. २८.०५.२०१८ आणि ३) मनपाना/नरवि/अंतिम मंजुरी/१८, दि. १०.१०.२०१८ रद्द समजण्यात यावी.

सहपत्र :– वरीलप्रमाणे.

सहाय्यक संचालक
नगर रचना विभाग
महानगरपालिका नागपूर.

प्रतिलीपी:–१) नगर भुमापन अधिकारी क्र. १, नागपूर.
२) सहाय्यक आयुक्त, धंतोली झोन क्र. ४, महानगरपालिका, नागपूर.